# सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल अण्ड जुनिअर कॉलेज, नागपूर

**व्दितीय सत्र परीक्षा 2019–20**

**विषय – हिंदी**

**समय –2.00 घंटे** **वर्ग – 5 (B)** **गुण – 40**

---


**प्रश्न 1ला अ पुढील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती कराः**


सातपुड्याच्या परिसरातील कंदमुळे, फळे, पानाफुलांनी बहरलेले घनदाट जंगल. त्या जंगलात आदिवासी लोक राहायचे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून, निसर्गाचे नियम पाळून आदिवासी आपले जीवन जगत होते. अशा या आदिवासींच्या होळीला सुमारे आठशे वर्षांचा इतिहास आहे.

होलिकोत्सवाची सुरवात माघ पौर्णिमेला दांडापूजनाने होते. वाड्यापाड्यांतून ढोलांचा आवाज घुमू लागतो. कुडाच्या घरांच्या सांदीकोपऱ्यात, खुंटीला, आढयाला बांधून ठेवलेले ढोल बाहेर निघू लागतात. फाल्गुन पौर्णिमेच्या होळीची जय्यत तयारी चालू होते. पोटापाण्यासाठी गाव सोडून गेलेले मजूर या सणासाठी हळूहळू गावाकडे येतात.

आमच्या गावातील आमच्या डोहल्या आपल्या चिल्यापिल्यांना घेऊन सणासाठी गावात यायचा. अख्ख्या सातपुड्यात आमच्या डोहल्या प्रसिद्ध होता. आमश्या ढोल वाजवू लागला. की वाड्या पाड्यांवरची माणसे ढोलाच्या दिशेने नाचत नाचत येत असत. न थकता रात्र – रात्र ढोल वाजवण्यात आमश्या पटाईत होता. 'यंदाच्या होळीत खूप ढोल वाजवू. अख्खा सातपुडा दणाणून सोडू' हि शपथ घेतली.

**1) आकृत्या पूर्ण करा.** (2)




2) आदिवासींच्या पाड्यांना होळीचा इतिहास  (1)

**3) वाक्य पूर्ण करा.** (1)

होलिकोत्सवाची सुरुवात माघ ––––

4) मजूर कशासाठी गाव सोडून गेलेले असतात ? (1)

5) पटाईत या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा. (1)

6) 'आमश्या डोहला' ने कोणती शपथ घेतली होती ? (1)

7) आमश्याच्या ढोल वाजवण्याचे वैशिष्टय काय होते ? (1)

**प्र. 2 रा पुढील उताऱ्याच्या आधारे कृती पूर्ण करा.**

कोल्हापूरमधल्या कळंबा मध्यवर्ती कारागृहाजवळ रस्त्याला लागूनच एका सरळरेषेत पंथरा विस झोपड्या होत्या. एका झोपडीत आम्ही राहत होतो. मातीच्या कच्च्या विटांनी बांधलेल्या भिंती त्यापण पावसाचं पाणी मुरून पडण्याच्या बेतात होत्या फुटकीतुटकी कौलं वरती टाकली होती. आतली जमीन तर सतत ओलसरच असायची त्यामुळे त्या झोपडीत नेहमी कुबर वास यायचा. वरची कौलं डोक्याला धाडकन लागायची.


झोपडीत एका बाजूला चार – पाच फाटक्या वाकळा पडलेल्या. सात आठ जरमनची ताटं, चिंध्यांची

फाटक्या कपड्यांची दोन तीन गाठोडी, पाण्यासाठी दोन जरमनची पातेली, एक पत्राची घागर आणि अशोकदादाला नुकतीच मिळालेली पोलीसखात्याची काळी पत्राची पेटी.

उद्या आम्हांला पुन्हा बोरगावला पालांवर जायचं होतं बारिक सारीक सामान दुसऱ्या पिशवीत भरू लागले होते, तोच अशोकदादा डयुटीवरून घरी आला. तो आईला सामान भरताना बघून म्हणाला ''आई, कुठं जायची तयारी चाललीय' आई म्हणाली, ''जातू मागाला ––– किती दीस हितं बसून खायचं ?''

बाबा रागानंच दादाला म्हणाले, ''तुजं डोस्कंबिस्कं फिरलं का काय ?

**आकृती पूर्ण कराः** **(2)**




2) झोपडीत नेहमी वास यायचा (1)

**3) कोण कोणास म्हणाले ते लिहा.** (1)

''आई, कुठं जायची तयारी चाललीय?''

4) उताऱ्यात आलेले जोड शब्द लिहा. (1)

जसे – शोधाशोध

1) –––––– 2) –––––––

5) लेखिकेच्या घराचे वर्णन करा. (2)

**पदय**

**प्र 3 रा खालील कवितेच्या आधारे कृती करा**

आता लागे मर्गिसर
आली कापनी कापनी
आज करे खालेवऱ्हे,
डाव्या डोयाची पापनी!
पडे जमीनीले तढे,
आली कापनी कापनी.
तशी माझ्या डोळयापुढे,
उभी दान्याची मापनी.
शेत पिवये धम्मक
आली कापनी कापनी
आता धरा रे हिंमत,
इथ्ये ठेवा पाजवुनी.
पीक पिवये पिवये,
आली कापनी कापनी
हातामधी धरा इय्ये,
खाले ठेवा रे गोफनी.

काप काप माझ्या इय्या,
आली कापनी कापनी.
थाप लागली पिकाची
आली डोयाले झापनी!

आली पुढे रगडनी
आता कापनी कापनी.
खये करा रे तय्यार,
हाती घीसन चोपनी.

**बहिणाबाई चौधरी**

**आकृती पूर्ण करा:**

1) कापणी या महिन्यात सुरू होते. → [ ] (1)

2) कापणीसाठी आलेल्या पिकांचा रंग → [ ] (1)

3) कवयित्रीने विळयांना धार लावून ठेवायला का सांगितले आहे ? (1)

4) या कवितेच्या कवयित्रीचे नाव लिहा. (1)

**5) खालील अर्थ असलेल्या कवितेतील ओळी शोधा व लिहा!** (1)

हातातली गोफण खाली ठेवा व हातात विळे घ्या.

**6) खालील ओळींचा अर्थ लिहा.** (1)

शेत पिवये धम्मक
आली कापनी कापनी
आता धरा रे हिंमत,
इय्ये ठेवा पाजवुनी.

**प्र 4 था 1) समानार्थी शब्द लिहा :** (1)

1) कारागृह =

2) प्रजा =

**2) विरूद्धार्थी शब्द लिहा** (1)

1) दुष्काळ X

2) तोटा X

**3) खालील शब्दांमध्ये लपलेले (दडलेले ) शब्द शोधा व लिहा** (1)

उदा : झोपायला – झोपा, पाय, पाला, झोला.

1) आजकाल –

**4) खालील वाक्यातील विशेषण शोधून लिहाः** (1)

पाटीतही हिरवीगार मेथी उन्हाने कोमेजून पिवळी पडू लागली होती.

1) –––––– 2) –––––––––

**5) खालील वाक्यातील क्रियापद शोधून लिहाः** (2)

1) शिक्षकांनी मुलींचे अभिनंदन केले.

2) राधाने टाळया वाजवल्या.

**6) खालील शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. उपयोग कराः** (2)

1) शपथ घेणे

2) तहानभूक विसरणे

**प्र. 5 वा पुढील पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहाः** (5)

1) होळी

2) आवडता प्राणी

3) आवडते झाड

4) आवडते शिक्षक

**प्र. 6 वा पत्रलेखन**

उन्हाळयाच्या सुट्टीत तुमच्या घरी बोलवण्यासाठी मित्राला पत्र लिहाः (3)

**किंवा**

शैक्षणिक सहलीसाठी बसची चौकशी करणारे पत्र एस. टी. बस आगार व्यवस्थापक मुंबई सेंट्रल यांना लिहा.

**प्र. 7 वा खालील मुद्दयांच्या आधारे कथा पूर्ण करा व शिर्षक दया आणि तात्पर्य लिहाः (3)**

दोन मित्र –– संकटामध्ये एक – दुसऱ्याची मदत करण्याचा निश्चय –– जंगलातून जाणे –– अस्वलाचे येणे –– एक झाडावर चढतो –– दुसरा जमिनीवर असतो –– अस्वल जवळ येणे –– कानात सुघॅने आणि निघून जाणे –– दुसऱ्या मित्राचे झाडावरून खाली येणे –– विचारणे ''अस्वलाने तुझ्या कानात काय सांगितले ?'' उत्तर स्वार्थी मित्रापासून दूर रहा.

***